# अनिरुध्द मी



माझ्या मनात मला भिन्न मानणारा संगणक आहे
त्याला वाटते तोच माझ्या देहात्मनाचा स्वामी
मनाच्या गाभा-यात तो शून्यांत एकांची गणीतं मांडतो
मात्र स्वतःला समजतो स्वतंत्र आणि निर्विकार
माझ्या नकळत मी केलेला असतो त्याचा स्वीकार

पण कधी कधी माझ्या मनात रान माजते
भावनांचं, यातनांचं, वेदनांचं
आणि त्या अतिरेकात गुदमरतात माझे प्राण
करतात संगणकाला हैराण
तेंव्हा मला उमजते लाभलेल्या श्वासाचं अनुदान

श्वासा आणि उच्छ्वासात संगणकाला स्थान नाही
फक्त त्यांच्यातच माझा प्राण आहे
माझं निराकारी अधिष्ठान आहे

तिथं असतो मी ध्यानस्थ अद्री
वाढू देतो अंवतीभंवती किर्रतेचं रान
चढू देतो माझ्या कडयाकोप-यात
पीळ घेणा-या रानवाटा आणि
माथ्यावरून मृत्युला कवटाळणारी निसरडी
चकाकतात त्यांच्यावर उदयास्ताचे सूर्य
धुक्यातून वाहताना जीवनाचा निर्झर

त्या गिरीधारी मीच असतो माझा पुजारी
स्वतःलाच अर्पितो श्वासांचा सुगंध
माझ्या श्वासांचीच मला खरी सोबत आहे
त्यांच्यातच माझ्या अस्तित्वाची ग्वाही आहे
मी स्वयंभू आहे, स्वस्पर्शीत आहे
क्षणभर घेतल्या श्वासात तरी
मी माझा मोकळा आहे, अनिरुद्ध आहे